# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषद कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.३० ऑगस्ट, २०१० दुपारी १२:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार, दि.३०/०८/२०१० रोजी दुपारी १२:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बा. पां. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | मा. डॉ. अ. ना. बारबोले | सदस्य |
| ३) | मा. डॉ. ला. प. देशमुख | सदस्य |
| ४) | मा. प्राचार्य डॉ. रा. ना. शेंडगे, संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | मा.प्राचार्य डॉ. चं. बि. कोळेकर | सदस्य |
| ६) | मा. डॉ. प्र. गो. मोरे | सदस्य |
| ७) | मा. डॉ. एन. बी. पवार | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती नं. वि. साठे | सदस्या |
| ९) | मा. श्री. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १०) | मा. श्री. ना. रा. गरड | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती मि. सु. कदम | सदस्या |
| १२) | मा. डॉ. दा. जो. साळुंखे | स्थायी निमंत्रित |
| १३) | मा. डॉ. दि. द. पुजारी | स्थायी निमंत्रित |
| १४) | मा. कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे | सचिव |

**अनुपस्थिती :**

मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे व ॲड रा. पा. सब्बन यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. मा.अध्यक्षमहोदयांनी याची नोंद घेतली.

**स्वागतः**

सचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**कार्यवाही अहवालामध्ये दुरुस्ती :**

१) कार्यपूर्ती अहवालामध्ये अ.क्र. ६ मध्ये, "विद्यापीठातील" हा शब्द वगळण्यात यावा.
२) अ.क्र. १८ मध्ये, "देण्याची कार्यवाही सुरु आहे" ऐवजी "देवून काम सुरु आहे" अशी दुरुस्ती करावी.
३) अ.क्र. २२ मध्ये, "कार्यवाही चालू आहे" ऐवजी "कार्यवाही पूर्ण" अ.क्र. २५ (७) मध्ये, "कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे" ऐवजी "पूर्ण" अशी दुरुस्ती करावी.

सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.

**विषय क्र.१** **दि.१८ जून, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

| | |
|---|---|
| ठराव क्र.१ | दि.१८ जून, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. |

**विषय क्र.२** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आणि मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांकरिता विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करण्याबाबतची बाब विचारार्थ.**

**(सोबत पत्राची प्रत )**

**(टिपणी :** महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे-१ यांचेकडील दिनांक ०४.०८.२०१० च्या पत्रान्वये सोलापूर विद्यापीठात केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेचे विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

उक्त मार्गदर्शन केंद्र हे अनुसूचित जातीच्या ५० विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेचे विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करावे लागणार आहे. सदर विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था, वर्गखोल्या, ग्रंथालय व अभ्यासकक्ष व प्रशासकिय सेवक वर्ग इत्यादी बाबी विद्यापीठाकडून उपलब्ध करून द्यावे लागणार आहे. त्याकरिता लागणारा निधी ५० विद्यार्थ्यांकरिता रु.११,२५,०००/-वरील संस्थेकडून विद्यापीठास प्राप्त होणार आहे. सोबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१ यांचे दिनांक.०४.०८.२०१० रोजीचे पत्र व स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी अटी व शर्तीची छायांकित प्रत जोडली आहे. (वरीलप्रमाणे)

वरील उपक्रम १)डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २)पुणे विद्यापीठ, पुणे, ३)स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ४)शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व ५)संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती येथे राबविला जात आहे.

सबब केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षाकरिता विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३** | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आणि मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांकरिता विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.४** **सामाजिकशास्त्रे विद्याशाखेकडील Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले New Ordinance No. 25 व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे Ordinance **जोडलेले आहे**)

(**टिपणी - Social Work of Education** अभ्यासमंडळाच्या दि.३१/१२/२००९ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले New Ordinance No. 25 अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

सामाजिकशास्त्र विद्याशाखा दि. १७/०४/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार सदरचे New Ordinance No. 25 विद्याशाखेने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. १६/०८/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १२३ नुसार वरीलप्रमाणे Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमाचे New Ordinance No. 25 विद्यापरिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

**सामाजिकशास्त्रे विद्याशाखेकडील Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले New Ordinance No. 25 हे जून २०१०-११ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.४** | **सामाजिकशास्त्रे विद्याशाखेकडील Master of Social Work (M.S.W.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेला (New Ordinance No. 25) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.५ विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Revised Ordinance No.10 व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत - **Ordinance** जोडलेले आहे.)

**(टिपणी -** विज्ञान विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासमंडळाच्या दि. २८/०६/२०१० रोजीच्या बैठकीत B.Sc.Part-I या पाठयक्रमाचा **(१०० गुणांऐवजी ५०)** सत्र पध्दती अभ्यासक्रम व सुधारीत केलेले Ordinance No. 10 पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत Ordinance अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि. १७/०७/२०१० रोजीच्या पत्रानुसार सदरचे Ordinance विद्याशाखेच्या वतीने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. १६/०८/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ९३ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत Ordinance No.10 व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहे.

**विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले सुधारीत Ordinance No.10 महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.५** | **विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेला सुधारीत अध्यादेश (Revised Ordinance No.10) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.६ विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Revised Regulations व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत - **Regulations** जोडलेले आहे.)

**(टिपणी -** विज्ञान विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासमंडळाच्या दि. २८/०६/२०१० रोजीच्या बैठकीत B.Sc.Part-I या पाठयक्रमाचा **(१०० गुणांऐवजी ५०)** सत्र पध्दती अभ्यासक्रम व सुधारीत केलेले Regulations पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत Regulations अभ्यासमंडळाने स्विकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी दि. १७/०७/२०१० रोजीच्या पत्रानुसार सदरचे Regulations विद्याशाखेच्या वतीने स्विकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. १६/०८/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ९३ नुसार वरीलप्रमाणे सुधारीत Regulations व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहे.

**विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले सुधारीत Regulations महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.६** | **विज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Revised Regulations बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.७ शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले New Ordinance No. 24 व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत - B. P. Ed. & M. P. Ed. **Ordinances जोडलेले** आहे.)

**(टिपणी- शारीरिक शिक्षणशास्त्र** (Physical Education) अभ्यासमंडळाच्या दि. १९/०७/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार B.P.Ed. & M.P.Ed. या कोर्सचे Ordinance पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत Ordinance No. 24 अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेला आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखा दि. २२/०७/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार सदरचे Ordinances विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. १६/०८/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५९ नुसार वरीलप्रमाणे B.P.Ed. & M.P.Ed. या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमाचे Ordinances विद्यापरिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

**शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले New Ordinance No. 24 हे जून २०१० पासून लागू करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.७** | **शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेला (New Ordinance No. 24) बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.८ शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Rules & Regulations व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत - B. P. Ed. & M. P. Ed. Rules & Regulations **जोडलेले** आहे.)

**(टिपणी- शारीरिक शिक्षणशास्त्र** (Physical Education) अभ्यासमंडळाच्या दि. १९/०७/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार B.P.Ed. & M.P.Ed. या कोर्सचे Rules & Regulations पुनश्चः पडताळणी करुन घेऊन, सुधारीत Rules & Regulations अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेला आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखा दि. २२/०७/२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५ नुसार सदरचे Rules & Regulations विद्याशाखेच्या वतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. १६/०८/२०१० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५९ नुसार वरीलप्रमाणे B.P.Ed. & M.P.Ed. या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमाचे Rules & Regulations विद्यापरिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

**शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेले Rules & Regulations हे जून २०१० पासून लागू करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.८** | **शिक्षणशास्त्र विद्याशाखांतर्गत पदवी व पदव्युत्तर (B.P.Ed. & M.P.Ed.) या कोर्सचे सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या Rules & Regulations बाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.९** | **दि. १६/०८/२०१० रोजीच्या विद्यापरिषद बेठकीतील आयत्या वेळचा ठराव क्र. १३६ (५९) अन्वये, O.80-A हा अध्यादेश शिथिल करणेबाबतची विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

**O.80-A :- *A candidate shall have to complete the B.A./B.Com./ B.Sc. Part-I examination within a period of six years and also B.A./B.Com./ B.Sc. Part-II and III examination within a period of six years form his/her first appearance to the candidate at the respective examinations will be treated as a null and void if he/she fails to complete the respective examination within the stipulated time of six years (i.e. within a period of six years form the date of his/her first appearance of the respective examination) and he/she shall have to appear at the examination for all the subjects of Part-I or II or III a fresh as per rules as case may be.***

**(टिपणी -** शै. वर्ष २०१०-११ या चालूवर्षी विद्यापीठ स्थापनेपासूनच्या पदवी व पदव्युत्तर या विविध विद्याशाखांतर्गत प्रवेशित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रस्तुत विद्यापीठात मार्च/एप्रिल २००५ ते मार्च/एप्रिल २०१० या परीक्षा कालावधीत परीक्षा नोंदणीनंतर सहा वर्ष पूर्ण होतात. या विद्यापीठास शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेच्यावेळी लागू असलेला O.80-A जसाच्या तसा लागू केलेला आहे, अशा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचा O.80-A नुसार Examination Registration Performns रद्द होतो. यास्तव सदर विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध रहात नाही.

यास्तव, विद्यापीठ स्थापनेपासून O. 80-A लागू असलेला अध्यादेश, सत्र पध्दतीचा अवंलब केल्यानंतर, विविध विद्याशाखांतर्गत सुधारीत अध्यादेशात O. 80-A हा अध्यादेश वगळण्यात आलेला आहे.

**सबब, विद्यापरिषद बेठकीतील आयत्या वेळचा ठराव क्र. १३६ (५९) अन्वये, O.80-A हा अध्यादेश (६ वर्षात पदवी उत्तीर्ण होण्याची अट) शिथिल करणेबाबतची विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. )**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.९** | **O.80-A हा अध्यादेश शिथिल करण्याबाबतची विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१० सोलापूर विद्यापीठाचा शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंतचा शैक्षणिक बृहत आराखडयास मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.**

**(सोबत शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चा शैक्षणिक बृहत आराखडा)**

टिपणी - शै.वर्ष २००६-२०११ पर्यंतच्या सोलापूर विद्यापीठाच्या बृहत आराखडयाची मुदत संपली आहे. शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंतचा सोलापूर विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी बृहत आराखडा तयार करण्यास्तव बृहत आराखडा उपसमिती गठीत केली होती.

उपसमितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सोलापूर जिल्हयातील प्राचार्य, शिक्षणतज्ञ, प्राध्यापक, व नागरीकांकडून जाहिर निवेदनांव्दारे प्राप्त सूचनांनुसार तसेच विद्यापीठातील शैक्षणिक संकुले व भविष्यातील विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार अभ्याक्रमांचा समावेश करुन शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चा प्रस्तावित बृहत आराखडा उपसमिती सदस्यांनी बृहत आराखडा तयार करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाला सादर केला होता.

दि.२२ जून २०१० रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेत शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चा बृहत आराखडा सादर केला असता दुरुस्तीसह ठराव क्रं ६ अन्वये व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्यात आला.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ नुसार बृहत आराखडयाला व्यवस्थापन परिषदेची शिफारसी नंतर विद्या परिषदेची मान्यता घेऊन महाराष्ट्र शासनाकडे पाठविणे आवश्यक होते.

. शै.वर्ष २०११-१२ चे नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव विहीत वेळेत स्विकारण्याकरीता सन २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाचा बृहत आराखडयाला विद्या परिषदेची मान्यता घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची शिफारस असणे आवश्यक होते.

दि.१६.०८.२०१० रोजी विद्या परिषदची सभा आयोजित करण्यात आली आहे. व तद्‌पूर्वी व्यवस्थापन परिषदेची सभा आयोजित होणार नसल्याने दि.१६.०८.२०१० रोजी आयोजित केलेल्या विद्या परिषदे समोर सन २०११-१२ ते २०१५-१६ चा बृहत आराखडा (सोबत जोडल्या प्रमाणे) मान्यतेस्तव सादर करण्यासाठी सदर बृहत आराखडयास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांची मान्यता दिलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| **ठराव क्र.१०** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.११ दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयावर शासन प्रशासकाची नेमणूक करेपर्यत प्रा.एन.बी.पवार यांना दैनंदिन कामकाज पाहणेसाठी मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अधिकार दिल्याची बाब माहितीस्तव.**

**(सोबत पत्र जोडले आहे)**

**टिपणी** : सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दि. २४-१२-२००८ रोजीच्या बैठकीमध्ये उपरोक्त महाविद्यालयावर शासनातर्फे प्रशासक नेमण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दि.१२-०६-२००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र.३१(१०) अन्वये दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज पाहण्याचे अधिकार श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात आले होते. त्यानुसार पत्र क्र.SUS/BCUD/AFFI/४९२/१८८९,दि.२९-०६-२००९ अन्वये मा.प्राचार्य, श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा यांना तसेच मा.अध्यक्षा/सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा, मा. सचिव (उच्च व तंत्रशिक्षण), मुंबई, मा. शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे व मा.शिक्षण सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर यांना ही कळविण्यात आले होते.

श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्राचार्य एम. ई. जगताप हे दि.३१-०७-२०१० रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्या ऐवजी उपरोक्त महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज पाहणेकरीता पर्यायी व्यवस्था करावी अशी विनंती मा.प्राचार्य एम.ई.जगताप दि.२७-०७-२०१० रोजीच्या पत्रान्वये केलेली आहे.

अद्याप सदर महाविद्यालयावर शासनाने प्रशासक नेमलेला नाही. तसेच नवीन शै.वर्ष २०१०-११ सुरु झालेले असून विद्यार्थ्यांना टी.सी., मायग्रेशन सर्टीफिकेट देणे, दैनंदिन फी स्विकारणे व इतर अनुषंगीक बाबीसाठी अडचणी येत आहेत. तसेच श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयात अद्याप प्राचार्याची नियुक्ती झालेली नाही तसेच संस्थेत असलेल्या अंतर्गत कलहामुळे सदर नियुक्तीस वेळ लागणार आहे. या अडचणीचा विचार करुन दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज पाहण्याचे अधिकार श्री.संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या स्थानिक महाविद्यालयातील प्रा. एन. बी. पवार यांना सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असल्याने मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| ठराव क्र.११ | मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

**विषय क्र.१२ सोलापूर विद्यापीठाचा शै.वर्ष २०११-१२ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडयास मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये दिलेली मान्यता व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.**

**(सोबत शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चा शैक्षणिक बृहत आराखडा)**

टिपणी - शै.वर्ष २००६-२०११ पर्यंतच्या सोलापूर विद्यापीठाच्या बृहत आराखडयाची मुदत संपली आहे. शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंतचा सोलापूर विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी बृहत आराखडा तयार करण्यास्तव बृहत आराखडा उपसमिती गठीत केली होती.

उपसमितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सोलापूर जिल्हयातील प्राचार्य, शिक्षणतज्ञ, प्राध्यापक, व नागरीकांकडून जाहिर निवेदनांव्दारे प्राप्त सूचनांनुसार तसेच विद्यापीठातील शैक्षणिक संकुले व भविष्यातील विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार अभ्याक्रमांचा समावेश करुन शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ चा प्रस्तावित बृहत आराखडा उपसमिती सदस्यांनी बृहत आराखडा तयार करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाला सादर केला होता.

तसेच सदर समितीने सन २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या प्रस्तावित शैक्षणिक बृहत आराखडया सोबत प्रस्तावित शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या बृहत आराखडयातील अभ्यासक्रमांचा समाविष्ट करुन शै.वर्ष २०११-१२ या एका वर्षाचाही प्रस्तावित बृहत आराखडा तयार करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाला शिफारस केलेला होता.

दि.२२ जून २०१० रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेत शै.वर्ष २०११-१२ या एका वर्षाचा बृहत आराखडा सादर केला असता दुरुस्तीसह ठराव क्रं ७ अन्वये व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्यात आला.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ नुसार बृहत आराखडयाला व्यवस्थापन परिषदेची शिफारसी नंतर विद्या परिषदेची मान्यता घेऊन महाराष्ट्र शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

शै.वर्ष २०११-१२ चे नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव विहीत वेळेत स्विकारण्याकरीता सन २०११-१२ या एका वर्षाचा बृहत आराखडयाला विद्या परिषदेची मान्यता घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची शिफारस असणे आवश्यक होते.

दि.१६.०८.२०१० रोजी विद्या परिषदची सभा आयोजित करण्यात आली होती. व तत्पूर्वी व्यवस्थापन परिषदेची सभा आयोजित होणार नसल्याने दि.१६.०८.२०१० रोजी आयोजित केलेल्या विद्या परिषदे समोर सन २०११-१२ या एका वर्षाचा बृहत आराखडा (सोबत जोडल्या प्रमाणे) मान्यतेस्तव सादर करण्यासाठी सदर बृहत आराखडयास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांची मान्यता दिलेली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१२** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१३ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धा खेळताना खेळाडूंना प्रवासा दरम्यान व प्रत्यक्ष खेळा दरम्यान दिला जाणारा दैनिक भत्त्यात वाढ करण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

दि ०७/०६/२०१० रोजीच्या बोर्ड ऑफ स्पोटर्स च्या बैठकीचा विषय क्र ०२ व आयत्या वेळचा विषय क्र ०१ आवलोकनार्थ.

टिपणी : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धा खेळताना खेळाडूंना प्रवासा दरम्यान व प्रत्यक्ष खेळा दरम्यान दिला जाणारा दैनिक भत्ता रू ८०/-ऐवजी रू.१००/- वाढविण्याची व सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन सर्व खेळाडूंचा स्थनिक स्पर्धाचा दैनिक भत्ता ३०/-ऐवजी ५०/- करण्यास तसेच परगावी स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंचा दैनिक भत्ता रू.५०/- ऐवजी रू.७०/-ने वाढ करण्याचा ठराव बोर्ड ऑफ स्पोटर्स च्या बैठकीत करण्यात आलेला आहे ठरावानूसार सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर

**ठराव क्र.१३** **अखिल भारतीय आंतरविद्यापीठस्तरीय क्रीडा स्पर्धा खेळताना खेळाडूंना प्रवासादरम्यान व प्रत्यक्ष खेळादरम्यान दिल्या जाणाऱ्या दैनिक भत्त्यात वाढ करण्याबाबतची बोर्ड ऑफ स्पोर्टस्ची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | भत्त्याचे स्वरुप | सध्याचा दर प्रति दिन | सुधारीत दर प्रति दिन |
|---|---|---|---|
| १) | अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धा खेळताना व प्रत्यक्ष खेळादरम्यान दैनिक भत्ता | रु.८०/- | रु.१००/- |
| २) | विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन सर्व खेळाडूंचा स्थानिक स्पर्धांचा दैनिक भत्ता | रु.३०/- | रु.५०/- |
| ३) | परगावी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा दैनिक भत्ता | रु.५०/- | रु.७०/- |

**विषय क्र.१४ वैधानिक पदे मंजूरीबाबत शासनाशी केलेला पत्रव्यवहार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

(टिपणी :१) विद्यापीठातील रिक्त संवैधानिक पदे मंजूरी संदर्भात प्रस्ताव क्र.EST/१०६१८/२००८-०९ दिनांक २५/०३/२००९ रोजी संचालक, उच्च शिक्षण पुणे, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना पाठविण्यात आले होते. २) तदनंतर संबंधित पदे भरण्या संदर्भात प्रस्ताव क्रं. सोविसो/आस्था/संअप्र/ ५३६४ दिनांक ०७/१२/२००९ रोजी उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना विनंती करण्यात आली होती. ३) विद्यापीठाचे प्रस्ताव क्रं.सोविसो/आस्था/संअप्र/२००९-१०/६०२६ दिनांक ०५/०१/२०१० रोजी प्रस्ताव पाठवून संबंधितास अवगत करण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण पुणे यांनी त्यांचे पत्र क्रं.युएनआय/११३०/सांवि.पदे./सो.वि./विशि-१ ७३७४ दिनांक २२/०२/२०१० अन्वये ग्रंथपाल, संचालक विद्यार्थी कल्याण, संचालक प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा, कार्यक्रम समन्वयक राष्ट्रीय सेवा योंजना, संचालक क्रीडा विभाग ही पदे मंजूर करण्यासाठी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिफारस केली आहे.

शासनाने अद्याप पर्यंत आशयाचा शासन निर्णय सोलापूर विद्यापीठास निर्गमित केला नाही. सबब, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१४** | **विद्यापीठाची स्थापना २२ जुलै २००४ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार झाल्यानंतर सहा वर्षातच विद्यापीठाला "राष्ट्रीय सेवा योजनेचे उत्कृष्ट विद्यापीठ" म्हणून व "उत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक" म्हणून राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला तसेच राष्ट्रीय व राज्य पातळीवर विद्यापीठाने विविध क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवून प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिके प्राप्त केली. त्याचबरोबर विद्यापीठाने सन २००९-१० चा "आविष्कार" हा आंतरविद्यापीठ संशोधन महोत्सव आयोजित केला व त्याची विशेष दखलही मा.कुलपती कार्यालयाने घेतली. विद्यापीठाची अशीच भरभराट पुढे होण्यासाठी विद्यापीठात आवश्यक असलेली खालील संवैधानिक पदे राज्य शासनाकडून मान्य होवून मिळावीत याबाबत ही व्यवस्थापन परिषद महामहीम कुलपतीमहोदयांना विनंती करीत आहे.**<br>**१) ग्रंथपाल**<br>**२) संचालक विद्यार्थी कल्याण**<br>**३) संचालक प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा**<br>**४) कार्यक्रम समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना**<br>**५) संचालक क्रीडा विभाग** |

**विषय क्र.१५ वर्ग ०३ व ०४ च्या शिक्षकेतर पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबत राज्यशासनाच्या दिनांक ०५ जून, २०१० च्या शासन निर्णयातुन खासबाब म्हणून सूट मिळण्यासाठी मा.कुलपती यांना विनंती करणेबाबत.**

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठातील सरळसेवेसाठी रिक्त असलेल्या वर्ग ०३ व ०४ पदासाठीची जाहिरात प्रकाशित करुन उमेदवारांच्या छाननीची प्रक्रिया पुर्ण झाली आहे. परंतु शासन निर्णय क्रमांक असंक-१०१०/प्रक्र-१/२०१०/वित्तीय सुधारणा-१ दि.०५ जून, २०१० अन्वये गट क व ड मधील पदे भरण्यास निर्बंध घातलेला आहे. )

त्याअनुषंगाने विद्यापीठाने कार्यालयीन १) पत्र क्र. सोविसो/आस्था/२०१०-११/२३७५ दि. २९ जून, २०१० २) पत्र क्र. सोविसो/आस्था/२०१०-११/२४७१ दि. १ जुलै, २०१० रोजी शासन निर्णयातून खास बाब म्हणून सुट द्यावी अशी शिफारस महाराष्ट्र शासनास करुन या आशियाचे शासन निर्णय निर्गमित करणे बाबत विनंती करण्यात आली आहे.

त्यानुसार अपूऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुष्परिणाम याचा विचार करुन शासनाने १९ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये २१० शिक्षकेत्तर पदाना मंजूरी दिलेली आहे. सदर पदाची जाहिरात आकृती बंधानुसार क्र.सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८-३-२०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सद्यस्थितीत विद्यापीठात २१० शिक्षकेत्तर पदापैकी फक्त ७६ पदावर कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित १३४ पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत विद्यापीठाचा वाढता व्याप सलग्न महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांची दरवर्षी वाढत जाणारी संख्या, उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची बहुश्रुतता वाढविण्यासाठी उच्च शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी परीक्षा सुरळीत पारपाडण्याच्या दृष्टीने अत्यंत तोकडया कर्मचाऱ्यामध्ये विद्यापीठ प्रशासन कामकाज करित आहे.

तरी विद्यापीठातील वर्ग ०३ व ०४ संवर्गातील नियमित शिक्षकेत्तर पदांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याने उक्त वस्तुस्थितीचे गांभीर्य व विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता या विद्यापीठास शासनाकडून आकृतीबंधानुसार पदे मंजूरीनंतर प्रथमच सरळसेवेद्वारे वर्ग ०३ व ०४ मधील भरती प्रक्रिया राबविण्यास दिनांक ०५-०६-२०१० रोजीच्या शासन निर्णायातून खासबाब म्हणून सूट देण्यात यावी.अशी शिफारस महाराष्ट्र शासनास करुन या आशयाचे शासन निर्णय अद्याप प्रलंबित आहे. सबब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१५** | **विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर व प्रथमच आकृतीबंधानुसार शासनाने दि.१९ सप्टेंबर २००९ रोजी विविध २१० शिक्षकेतर पदे मंजूर केली. त्यानंतर सदर पदे भरण्यासाठी विद्यापीठाने प्रथमच दि.०८ मार्च २०१० रोजी जाहिरात देवून अर्ज मागविले आहेत. तद्नंतर शासनाने दि.०५ जून २०१० च्या निर्णयान्वये सदर भरतीवर बंदी घातली. सद्यस्थितीत विद्यापीठाचा वाढता व्याप संलग्न महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांची दरवर्षी वाढत जाणारी संख्या, उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची बहुश्रुतता वाढविण्यासाठी उच्च शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी परीक्षा सुरळीत पारपाडण्याच्या दृष्टीने वस्तुस्थितीचे गांभीर्य व विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता वर्ग ०३ व ०४ च्या शिक्षकेतर पदांच्या भरतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याने राज्यशासनाच्या दिनांक ०५ जून, २०१० च्या शासन निर्णयातुन खासबाब म्हणून सूट मिळून सदरची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यास परवानगी मिळण्यासाठी महामहीम कुलपतीमहोदयांना ही व्यवस्थापन परिषद विनंती करीत आहे.** |

**विषय क्र.१६ बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला आयोजनाकरीता मुदत ठेव रक्कम रु.३,००,०००/- निधी (चालू वर्षासाठीचा रक्कम रु. ३०,०००/-सह) अशी एकूण ३,३०,०००/- रक्कमेचे धनादेश स्वीकारुन, मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**(टिपणी -** -दि. १० मार्च २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ नुसार , कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला प्रस्ताव स्वीकरण्यात आलेला आहे.

| |
|---|
| **व्य. प. ठराव क्र. ११ :-** ***बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दरवर्षी सप्टेंबर महिन्यात व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठीच्या प्रस्तावाचा निधी फक्त विद्यापीठाच्या नावे ठेवण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्ताव स्वीकारण्यात आला.*** |

उक्त ठरावाच्या अनुषगांने, जनरल सेक्रेटरी, बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) यांनी दि. १६ एप्रिल २०१० रोजीच्या पत्रान्वये लेखी संमंती कळविलले आहे.

तसेच, दि. ११/०८/२०१० रोजी जनरल सेक्रेटरी, श्री. धनजंय कुलकर्णी बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) संघटनेच्या वतीने व्याख्यानामालेकरीता मुदत ठेव रक्कम रु. ३,००,०००/- (चालू वर्षासाठीचा खर्च रु. ३०,०००/- रक्कमेसह ) अशी एकूण रु. ३,३०,०००/- रक्कम धनादेशा व्दारे विद्यापीठाकडे सुपूर्त करण्यासाठी आले असता, मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने निधी स्वीकारला आहे.

| |
|---|
| *The Maharashtra Universities Act, 1994*<br>*Powers and duties of Management Council*<br>*Section 28 (h) - accept, on behalf of the university, trusts, bequests, donations and transfer of any movable or immovable property to the university.* |

**सदर बाबीवर मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव )**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१६** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१७** | **बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला संबंधीची नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(सोबत - नियमावली जोडलेली आहे.)

**(टिपणी** -दि. १० मार्च २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र. ११ नुसार , कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला प्रस्ताव स्वीकरण्यात आलेला आहे.

| |
|---|
| **व्य. प. ठराव क्र. ११ :-** ***बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दरवर्षी सप्टेंबर महिन्यात व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठीच्या प्रस्तावाचा निधी फक्त विद्यापीठाच्या नावे ठेवण्याच्या अटीस अधीन राहून प्रस्ताव स्वीकारण्यात आला.*** |

उक्त ठरावाच्या अनुषगांने, जनरल सेक्रेटरी, बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) यांनी दि. १६ एप्रिल २०१० रोजीच्या पत्रान्वये लेखी संमती कळविलले आहे.

तसेच, दि. ११/०८/२०१० रोजी जनरल सेक्रेटरी, श्री. धनजंय कुलकर्णी बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) संघटनेच्या वतीने व्याख्यानामालेकरीता नियमावली तयार करण्यात आली आहे.

**सबब, कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाले संबंधीची नियमावली विचारार्थ )**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१७** | **बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघटना औरंगाबाद (लातूर) व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला संबंधीच्या नियमावलीस मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१८ कला व भाषा इमारतीचे बांधकामाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत.**

दिनांक- ३० मार्च २०१० च्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेपुढे खालीलप्रमाणे विषय ठेवण्यात आला होता.

[टिपणी-सोलापूर विद्यापीठ परिसरातील कला व भाषा इमारतीचे बांधकाम करणे रुपये १,४१,२१,०००/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर १२.४०% जास्ती दराने म्हणजेच रुपये १,५८,७२,००४/- इतक्या रक्कमेचे श्री.एन.एम.मंठाळकर सोलापूर यांना देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| मूळ आदेश दिनांक | : | एसओएल/युटीवाय/६४७५ दि.८/११/२००६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | १२ महिने |
| उर्वरित काम पूर्ण करण्याचा आदेश | : | एसओएल/युटीवाय/५६ दि. ४/४/२००९ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | दि ३० सप्टेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढ | : | दि.३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढीसाठी आलेला विनंती अर्ज | : | दि. ५ नोव्हेबर २००९ |
| पुढील मुदतवाढ नाकारल्याचा दिनांक | : | दि. २३ नोव्हेंबर,२००९. |

सबब श्री. एन.एम.मंठाळकर यांचे दि. ५ नोव्हेंबर २००९ च्या पत्रानुसार मुदतवाढ देणेबाबबत व मुदतवाढीनंतर Price Varition Clause देणेबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला

**ठराव क्र-३ विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्रव्यवहार पाहता कंत्राटदारास दि-१.१२.२००९ ते दि-३०.०४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे.**

**तथापी ३०.०४.२०१० पर्यंत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रती दिन रु-१०००/- प्रमाणे दंड आकारणीची शिफारस करण्यात येत आहे.**

सदरची बाब दि.२२/३/२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

बांधकाम समिती **तांत्रिक समितीची शिफारस विचारात धेता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला**

ठराव क्र.२ [३] **विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्र व्यवहार पाहता कंत्राटदारास दि.१.१२.२००९ ते दि.३०.४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून अंतिम मुदत वाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे.तथापि दि. ३०.४.२०१० पर्यंत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रति दिन.२५,०००/-प्रमाणे दंड आकारण्याची शिफारस करण्यात आली.**

सबब बांधकाम समितीची शिफारस विषय क्र०८ अन्वये मंगळवार दिनांक-३० मार्च,२०१०रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये विचारार्थ सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला .

| | |
|---|---|
| **व्यवस्थापन परिषद सभा विषय क्र.०८** | **कला व भाषा इमारतीच्या बांधकामास दिनांक-३०.४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देण्याची तसेच दि.३०.४.२०१० पर्यंत बांधकाम पुर्ण न झाल्यास प्रति दिन रु-२५,०००/- प्रमाणे दंड आकारणी करण्याची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

तद्नंतर मे.एन.एम.मंठाळकर यांनी दिनांक १९/७/२०१० रोजी विद्यापीठ कार्यालयास पत्र देऊन रु-२५,०००/- ऐवजीबांधकाम करारनाम्यातील कलम क्र- ०७ नुसार रु-१०००/- इतका प्रति दिन दंडाची आकारणी करावी असे कळविले आहे. सदरचे काम दि-१८.०६.२०१० रोजी तत्वत: पुर्ण झाले आहे.

**करारनाम्यातील कलम खालील प्रमाणे आहे.**

The Contractor is liable for a penalty of Rs.1000 per day/as decided by Arcgutect & The Registar ,Solapur University Solapur if any delay in the completion of work.

यास्तव सदरच्या कामाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टंट मे. साई स्ट्रक्चर्स, एस.पी.मोहोळकर यांनीही वरील कलमाप्रमाणे रु-१०००/- प्रतिदिन दंड आकारण्याची शिफारस केली आह. सदरचे काम तांत्रिक दृष्टया दिनांक १८/६/२०१० रोजी पुर्ण झालेले आहे.

सबब दिनांक १.५.२०१० ते १८.६.२०१० पर्यंतच्या दंड आकारणीबाबत पुर्नविचारार्थ सादर]

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१८** | **विषयात बदल "कला व भाषा इमारतीचे बांधकामाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत" ऐवजी "कला व भाषा इमारतीचे बांधकामाकरिता कंत्राटदारास केलेल्या दंडाबाबत पुनश्च: विचारार्थ" अशी दुरुस्ती करावी.<br>दि.३०/०४/२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमधील ठराव क्र.०८ नुसार प्रतिदिन रु.२५,०००/- दंड करण्याची बांधकाम समितीची शिफारस मान्य करण्यात आली होती. परंतू, मूळ करारनाम्यात दंडाची तरतूद रु.१,०००/- प्रतिदिन असल्याने दि.३०/०४/२०१० रोजी दिलेली मान्यता सुधारीत करुन रु.१,०००/- प्रतिदिन दंडाची रक्कम कायम करण्यात आली.** |

**विषय क्र.१९ प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केंगाव, सोलापूर यांना विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शनची देण्यात आलेली मान्यता रद्द करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ**

[सोबत- सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या, सोलापूर यांचे पत्र जोडण्यात आले आहे.]

[टिपणी- विनाखंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरबाबतची पार्श्वभूमी खालील प्रमाणे आहे.

०१ सोलापूर विद्यापीठ, सोलापूर महानगरपालिका, दुध पंढरी आणि इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय या चौघांमध्ये एक्सप्रेस फीडर घेण्याचे ठरले होते.

०२ याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५/०७/२००६ रोजी आयत्या वेळेचा विषय क्र-१२ अन्वये सादर करण्यात आला होता.

०३ यावरील ठरावानुसार सोलापूर महानगरपालिका व इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय यांनी एक्सप्रेस फीडर घेण्याकरिता नकार दिला.

०४ त्यामुळे दूध पंढरी व सोलापूर विद्यापीठ यांची संयुक्तपणे एक्सप्रेस फीडर घेतला व यानुसार एक्सप्रेस फीडरपोटी येणा-या एकूण खर्चापैकी रु-१२,८३,६५०/- [एकूण रक्कमेच्या ५० टक्के रक्कम ] इतकी रक्कम विद्यापीठाने स्वतःचा हिस्सा म्हणून दि.४ जानेवारी २००७ रोजी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरलेली आहे.

०५ सोलापूर महानगरपालिकेचा पुणे नाका येथील जकात नाका केंगांव येथे असल्याने त्याचा ग्रामीण हद्दीत समावेश होतो. ग्रामीण विभागात सध्या १२-१२ तास विद्युत भारनियमन होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने सोलापूर विद्यापीठाकडील असणा-या एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शनची मागणी केलेली होती. याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि ३० मार्च,२००९ च्या बैठकीत विषय क्र-१२ अन्वये ठराव खालील प्रमाणे झाला आहे.

सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या सोलापूर विद्यापीठासमोरील जकात नाका येथे विना खंडीत विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याच्या प्रस्तावास खालील अटीच्या आधीन राहून मान्यता देण्यात आली.

०१. एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकण खर्च रु-२५,८६,७५०/- पैकी १/३ रक्कम सोलापूर महानगपालिकेने विद्यापीठ आणि दुध पंढरी यांच्यांकडे जमा करावी

ठराव क्र १ नुसार विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र.एसओएल/१४००,दि.५.६.२००९ अन्वये मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांना कळविले आहे. परंतु त्याबाबत त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

त्यानंतर सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांनी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन द्यावी अशी विनंती केली होती. एक्सप्रेस फीडरपाटी आलेल्या खर्चापैकी १/३ किंवा ५० टक्के रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती. सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक -२१.११.२००९ च्या बैठकीत विषय क्र.१८ अन्वये ठराव खालीलप्रमाणे झाला आहे

विना खंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांना खालील अटीस राहून मान्यता देण्यात आली.

०१ एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या एकूण खर्च रुपये-२५,८६,७५०/- पैकी ५० टक्के रक्कम व्याजासह सोलापूर विद्यापीठ व दूधपंढरी यांना आदा करावी.

०६ ठराव क्र १ नुसार विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र.एसओएल/५७९१,दि.२४.१२.२००९ अन्वये मा. व्यवस्थापकीय संचालक, दुध पंढरी, सोलापूर यांना याप्रकरणी मागणी संस्थेस एक्सप्रेस लाईन वरुन विद्युत कनेक्शन देणे बाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आला होता. त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, केगांव यांनीही त्यांचे कार्यालयीन पत्र दिनांक-२१.१२.२००९ अन्वये दुध पंढरी कार्यालयास नाहरकत पत्र मिळण्याबाबत विनंती केली होती. परंतु याप्रकरणी दुधपंढरी, सोलापूर यांनी काहीही

कळविले नव्हते.

त्यांनंतर प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केंगाव, सोलापूर यांनी एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन द्यावी अशी विनंती केली आहे. एक्सप्रेस फीडरपोटी आवश्यक असलेली कोटेशनची रक्कम ही भरणा करण्याची तयारी दर्शविली होते.

सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक -२८.०६.२०१० च्या बैठकीत विषय क्र.२५[१०] अन्वये ठराव खालीलप्रमाणे झाला आहे.

| | |
|---|---|
| अ | सोलापूर महानगरपालिका व साविञीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर यांना यापुर्वी दिलली मान्यता रद्द करणेस मान्यता देण्यात आली. |
| ब | एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन मिळण्याबाबत भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इजिनिअरींग केंगाव सोलापूर यांना खालील अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आली. |
| | १.एक्सप्रेस फीडरसाठी आलेल्या खर्चापोटी एकूण रुपये-२५,८६,७५०/-पैकी ५० टक्के रक्कम रु-१२,९३,३७५/- व्याजासह विद्यापीठ व दूधपंढरी यांना सहा महिन्याच्या आत आदा करावी. विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास मान्यता आपोआप संपुष्टात येईल असे ठरले. |

०७

०८ वरीलप्रमाणे झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका व साविञीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांना यापुर्वी दिलेली मान्यता रद्द करण्यात आली असल्याचे विद्यापीठ कार्यालयीन दिनांक-१५ जुलै,२०१० च्या पञान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच ठरावाच्या अनुषंगाने भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इजिनिअरींग केंगाव सोलापूर यांना एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन देण्याबाबत विद्यापीठ कार्यालयीन पञ क्र.-सोविसो/२७४९,दिनांक १३,जुलै,२०१० अन्वये एक्सप्रेस फीडर कनेक्शन मध्ये ५० टक्के सहभाग दुध पढरी, सोलापूर या संस्थेचा असल्याने त्यांच्याकडून याप्रकरणी अहवाल मागविण्यात आला होता.

त्याअनषंगाने सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या, सोलापूर यांनी त्याचे कार्यालयीन पञ क्र- जाजिदूधसंघ /प्रकल्प/२६०९/२०१० दि-७/८/२०१० अन्वये **भविष्यात दूध संघाची वीज मागणी वाढणार आहे. त्यावेळी सदर पुरवठयावरुन कनेक्शन दिल्यास दोघांनाही अडचण येऊ शकते. तरी सदरच्या लाईनवरुन कोणासही विद्युत पुरवठा देणे योग्य वाटत नाही असे कळविण्यात आले आहे.**

त्यामुळे प्राप्त झालेल्या अहवाला अवलोकनी घेता प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केंगाव, सोलापूर यांना एक्सप्रेस फीडरवरुन टॅप कनेक्शन बाबत व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्‍च विचारार्थ सादर ]

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१९** | **विद्यापीठासोबत"दूधपंढरी" हे एक्सप्रेस फीडरसाठी भागीदार असल्याने त्यांचे दि.०७/०८/२०१० रोजीच्या पत्रानुसार प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगाव सोलापूर यांना टॅप कनेक्शन देवू नये.** |

**विषय क्र.२० मुलांचे वसतीगृह इमारतीचे बांधकामाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत.**

दिनांक- ३० मार्च २०१० च्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेपुढे खालीलप्रमाणे विषय ठेवण्यात आला होता.

[टिपणी - सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे रुपये १,१९,१२,०००/-रक्कमेचे काम वाटाघाटीनंतर १३.३०% जादा दराने म्हणजेच रुपये १,३४,९६,२९६/- इतक्या रक्कमेचे श्री.एन.एम.मंठाळकर सोलापूर यांना देण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| मूळ आदेश दिनांक | : | एसओएल/युटीवाय/६४७४ दि.८/११/२००६ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | १२ महिने |
| उर्वरित काम पूर्ण करण्याचा आदेश | : | एसओएल/युटीवाय/५६ दि. ४/४/२००९ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | : | दि ३० सप्टेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढ | : | दि.३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| मुदतवाढीसाठी आलेला विनंती अर्ज | : | दि. ५ नोव्हेबर २००९ |
| पुढील मुदतवाढ नाकारल्याचा दिनांक | : | दि. २३ नोव्हेंबर,२००९ |

सबब श्री. एन.एम.मंठाळकर यांचे दि. ५ नोव्हेंबर २००९ च्या पत्रानुसार मुदतवाढ देणेबाबबत व मुदतवाढीनंतर Price Varition Clause देणेबाबत तांत्रिक समितीच्या दि.२०/३/२०१० च्या बैठकीसमोर वरिल विषय क्र.२ नुसार ठेवला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला .

सदरची बाब दि.२२/३/२०१० च्या बांधकाम समिती समोर परिनियम ३४३ व ३४५ नुसार ठेवला असता खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव क्र.२ **विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्रव्यवहार पाहता कंत्राटदारास दिनांक १.१२.०९ ते दि-३०.०४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे.**

**तथापी दि-३०.०४.२०१० पर्यंत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रती दिन रु-१०००/- प्रमाणे दंड आकारणीची शिफारस करण्यात येत आहे.**

बांधकाम समिती **तांत्रिक समितीची शिफारस खालील प्रमाणे सुधारित करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस करण्यात आली.**

ठराव क्र.२ [२] **विद्यापीठ प्रशासन व कंत्राटदारामध्ये झालेल्या पत्र व्यवहार पाहता कंत्राटदारास दि.१.१२.२००९ ते दि.३०.४.२०१० पर्यत भाववाढ गोठवून अंतिम मुदत वाढ देणेस शिफारस करण्यात येत आहे.तथापि दि. ३०.४.२०१० पर्यत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदारास प्रति दिन.२५,०००/-प्रमाणे दंड आकारण्याची शिफारस करण्यात आली.**

सबब बांधकाम समितीची शिफारस विषय क्र०७ अन्वये मंगळवार दिनांक-३० मार्च,२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषद सभा मध्ये विचारार्थ सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव झाला .

| | |
|---|---|
| व्यवस्थापन परिषद सभा विषय क्र.०७ | मुलांचे वसतीगृह इमारतीच्या बांधकामास दिनांक-३०.४.२०१० पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देण्याची तसेच दि.३०.४.२०१० पर्यंत बांधकाम पुर्ण न झाल्यास प्रति दिन रु-२५,०००/- प्रमाणे दंड आकारणी करण्याची बांधकाम समितीची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. |

तद्नंतर मे.एन.एम.मंठाळकर यांनी दिनांक १९/७/२०१० रोजी विद्यापीठ कार्यालयास पत्र देऊन रु-२५,०००/- ऐवजी बांधकाम करारनाम्यातील कलम क्र- ०७ नुसार रु-१०००/- इतका प्रति दिन दंडाची आकारणी करावी असे कळविले आहे.

**करारनाम्यातील कलम खालील प्रमाणे आहे**.

The Contractor is liable for a penalty of Rs.1000 per day/as decided by Arcgutect & The Registar ,Solapur University Solapur if any delay in the completion of work.

यास्तव सदरच्या कामाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टंट मे. साई स्ट्रक्चर्स एस.पी.मोहोळकर यांनीही वरील कलमाप्रमाणे रु-१०००/- प्रतिदिन दंड आकारण्याची शिफारस केली आह. सदरचे काम तांत्रिक दृष्ट्या दिनांक १८/६/२०१० रोजी पुर्ण झालेले आहे.

सबब दिनांक १.५.२०१० ते १८.६.२०१० पर्यंतच्या दंड आकारणीबाबत पुर्नविचारार्थ सादर.]

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२०** | **विषयात बदल "मुलांचे वसतीगृह इमारतीचे बांधकामाकरिता मुदतवाढ मिळणेबाबत " ऐवजी "मुलांच्या वसतिगृह इमारतीच्या बांधकामाकरिता कंत्राटदारास केलेल्या दंडाबाबत पुनश्च: विचारार्थ" अशी दुरुस्ती करावी.**<br>**दि.३०/०४/२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमधील ठराव क्र.०८ नुसार प्रतिदिन रु.२५,०००/- दंड करण्याची बांधकाम समितीची शिफारस मान्य करण्यात आली होती. परंतू, मूळ करारनाम्यात दंडाची तरतूद रु.१,०००/- प्रतिदिन असल्याने दि.३०/०४/२०१० रोजी दिलेली मान्यता सुधारीत करुन रु.१,०००/- प्रतिदिन दंडाची रक्कम कायम करण्यात आली.** |

**विषय क्र.२१ दि.१३.०७.२०१० रोजीच्या तक्रार निवारण समितीच्या शिफारसी परिनियम ३३५ अन्वये मान्यतेस्तव .**

( सोबत दि.१३.०७.२०१० रोजीचा कार्यवृत्तांत )

( टिपणी : तक्रार निवारण समितीकडे प्रा.डॉ.दफेदार जे.बी. यांचा तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. प्रस्तुत अर्जावर दि. २५.०५.२०१० रोजी झालेल्या त.नि.समिती विषय क्रं २ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यावरील ठराव क्रं २ ड) डॉ.दफेदार जे.बी.यांच्या तक्रारी अर्जावर कायदा अधिकारी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या दि.०५.०४.२०१० रोजीच्या सल्ल्यानुसार डॉ.दफेदार जे.बी यांचा दि.२४.१२.१९९८ चा Agreement Bond हा परिनियम २०० प्रमाणे कायदेशिर नसल्याने डॉ.दफेदार जे.बी यांना वालचंद इन्सिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांनी त्वरीत सेवामुक्ती आदेश निर्गमित करण्याची शिफारस दि.१८.०६.२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्रं १४ अन्वये मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. प्रस्तुत बैठकीतील ठराव क्रं १४ " तक्रार समितीच्या दि.२५.०५.२०१० रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारसीपैकी ठराव क्रं २ (प्रस्तुत तक्रार संस्थेच्या विरोधात असल्याने ) सदरची तक्रार पुनःश्च (Refer back) तक्रार निवारण समितीकडे पाठवावा. उर्वरीत शिफारशी स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. "

या अनुषंगाने दि. १३.०७.२०१० रोजी प्रा.डॉ.दफेदार जे.बी.यांच्या तक्रारी अर्जावर पुःनश्च सुनावनी संस्थाचालकांचे म्हणणे सादर करण्यास्तव तक्रार निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली

दि.१३.०७.२०१० रोजीच्या तक्रार निवारण समितीच्या बैठकीत डॉ.दफेदार जे.बी. यांच्या तक्रारी अर्जाबाबत मा.रणजित गांधी, सचिव, श्री.ए.पी.जे.जैन पाठशाळा, (वालचंद इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर ) यांनी उपस्थित राहून लेखी पत्राव्दारे म्हणेण सादर केले.

सदर म्हणण्यावर विद्यापीठ कायदा अधिकारी, यांचा अभिप्राय विचारात घेवून वरील प्रमाणे दि. २५.०५.२०१० रोजीची तक्रार निवारण समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस कायम ठेवण्यात आली.

सबब दि.१३.०७.२०१० रोजी तक्रार निवारण समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारसी परिनियम ३३५अन्वयें मान्यतेस्तव सादर)

उपरोक्त विषय दि.३०.०८.२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सादर करण्यास मान्यता असावी

| | |
|---|---|
| ठराव क्र.२१ | **तक्रार निवारण समितीच्या दि.१३/०७/२०१० रोजी झालेल्या सभेच्या शिफारशी परिनियम ३३५ अन्वये स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.२२ शै.वर्ष २०१०-११ चे शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांमध्ये बदल करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी :- शै.वर्ष २०१०-११ चे सोलापूर विद्यापीठ संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा अधिष्ठाता , सर्व विद्याशाखा यांनी खालील प्रमाणे निश्चित करण्यात आल्या होत्या.

प्रथम सत्र आरंभ - ०१ जुल २०१०े ते ३१ ऑक्टोंबर २०१०

सुटटी - १ नोव्हेंबर २०१० ते ९ नोव्हेबर २०१०

व्दितीय सत्र ३ १० नोव्हेंबर २०१० ते ३० एप्रिल २०१०

उपरोक्त सत्र आरंभ व सत्र समाप्त्ीच्या तारखांना विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली असून त्याप्रमाणे परिपत्रकाव्दारे सर्व संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

प्रा.डॉ.श्रीमती पठाण बी.बी, प्र.अधिष्ठाता, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या पत्रानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे व एन.सी.टी.ई , भोपाळ यांच्या नियमानुसार कामकाजाचे २०० दिवस पूर्ण होण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांमध्ये खालील प्रमाणे बदल करण्याबाबत व तसे सर्व संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कळविण्याबाबत विनंती केलेली आहे.

प्रथम सत्र आरंभ ०१ जुलै २०१० ते ३० नोव्हेंबर २०१०

सुटटी - ०१ डिसेंबर २०१० ते १५ डिसेंबर २०१०

व्दितीय सत्र - १६ डिसेंबर २०१० ते २० मे २०११

सत्रारंभ व सत्र समाप्तीचे वेळापत्रक जोडले आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३० (r) प्रमाणे सदरच्या तारखा विद्यापरिषदे मार्फत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याची कायद्यात तरतूद आहे. या अनुषंगाने दि.१६.०८.२०१० रोजीच्या विद्या परिषदेच्या सभेत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या सत्र आरंभ व सत्र समाप्त्ीच्या तारखांमध्ये बदल करण्याबाबतचे मा.डॉ. श्रीमती पठाण बी.बी., प्र.अधिष्ठाता यांचे पत्र विचारार्थ सादर केले असता ठराव क्रं १०८ दि.१६.०८.२०१० अन्वये विद्यापरिषदेने मा.डॉ. श्रीमती पठाण बी.बी., प्र.अधिष्ठाता यांनी सुचविलेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना मान्यता दिलेली आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांत बदल करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव क्र.२२ | **शै.वर्ष २०१०-११ चे शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.<br>प्रथम सत्र आरंभ ०१ जुलै २०१० ते ३० नोव्हेंबर २०१०<br>सुटटी - ०१ डिसेंबर २०१० ते १५ डिसेंबर २०१०<br>व्दितीय सत्र - १६ डिसेंबर २०१० ते २० मे २०११** |

**विषय क्र.२३ शैक्षणिक वर्ष २०१० - ११ करिता विद्यापीठातील विविध संकुलासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview व्दारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे ही बाब माहितीस्तव.**

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठातील संकुलासाठी / विभागासाठी मागील शैक्षणिक (२००९-१०) वर्षाप्रमाणेच सोबत जोडल्यानुसार प्राध्यापक -१ सहयोगी प्राध्यापक -२ व सहाय्यक प्राध्यापक -३३ शैक्षणिक वर्ष २०१० - ११ साठी यांची अवश्यकता असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७७ मधील तरतूदी प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in- Interview व्दारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीची बैठक दिनांक ०१/०७/२०१०, ०२/०७/२०१०, ०३/०७/२०१०, १७/०७/२०१० व ०९/०८/२०१० रोजी आयोजित करुन Walk-in- Interview व्दारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेद्वांराना नियुक्ती आदेश निर्गमित करुन सेवेत रुजू करुन घेण्यात आले आहेत.सबब, व्यवस्थापन परिषदेसाठी माहितीस्तव.)

| ठराव क्र.२३ | मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
|---|---|

**विषय क्र.२४ दि.२६/०८/२०१० च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी.**

टिपणीः दि.२६/०८/२०१० रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दि.२६/०८/२०१० च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.२६/०८/२०१० रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी).

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.२४** | **खरेदी समितीच्या दि.२६/०८/२०१० रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे ठरावासमोर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | |
| | **ख.स.ठराव क्र.१** | **नोंद घेण्यात आली.** |
| | **ख.स.ठराव क्र.२** | **M/s. Intellicon Private Ltd., Pune यांच्याकडून Video Conferencing Unit खरेदी करण्याबाबत शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ख.स.ठराव क्र.३** | **मे. गुंजाळ फार्मस ॲन्ड नर्सरी कुंजीरवाडी पुणे यांच्याकडून विद्यापीठ परिसरात झाडे लावण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. दोन झाडांमधील अंतर किमान १० फूट असावे.** |
| | **ख.स.ठराव क्र.४** | **जे. सी. बी. च्या कामासाठी मे. देवराज कन्स्ट्रक्शन, सोलापूर यांच्याबरोबर प्रतितास रु.५९५/- या दराने वार्षिक दरकरार करण्याची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **ख.स.ठराव क्र.५** | **त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार मे.हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस सोलापूर या फर्मला विद्यापीठाच्या आवारातील उपाहारगृह चालविण्यास देण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | | **(उर्वरित ठराव पुढील पानावर)..** |

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.२४ | ख.स.ठराव क्र.६ | अ.क्र. ३२ (Envelop १५" x १२" cloth ledger) च्या Lowest १ व Lowest २ मध्ये मोठी तफावत असल्याने दरपत्रके मागवून खरेदी करण्याबाबत व अ.क्र.३८ (Revaluation Register) हे Lowest २ असलेल्या मे.अनिल प्रिंटस यांच्याकडून छपाई करुन घेण्याबाबत व उर्वरित खरेदी कमीत कमी दर असणाऱ्या फर्मकडून करण्याबाबत इ. शिफारशी स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. |
| | ख.स.ठराव क्र.७ | मे. सनशाईन सर्व्हिसेस, सोलापूर यांचे दर सर्वात कमी असल्याने सदर फर्मसोबत दरकरार करण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. |

**विषय क्र.२५ (प्रस्तुत विद्यापीठास पूर्वीच्याच खाजगी कंत्राटदारास मनुष्यबळ पुरविण्यासाठी मुदतवाढ दिल्याचीबाब माहितीस्तव.)**

(टिपणी: माहे ०१ मार्च, २०१० ते ३१ मे, २०१० या कालावधीत सोविसो/आस्था/२००९-१०/१०१५८ दि. ०२/०३/२०१० च्या आदेशान्वये तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. याबाबत दि. १० मार्च, २०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये विषय क्र. १८ (३) नुसार तीन महिने मुदत दिल्याचीबाब माहितीस्तव ठेवण्यात आली होती.

मुदतवाढीचा कालावधी संपत आला असल्याने मा. कुलगुरु महोदय यांनी मे. वर्षा विजग्राहक या संस्थेस दि. १६ जून, २०१० ते १५ ऑगस्ट, २०१० पर्यंत अशी मुदतवाढ दिली. त्यानतर ही कार्यालयास कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने मा. कुलगुरु महोदय यांनी मे. वर्षा विजग्राहक या संस्थेस दि. १९ ऑगस्ट, २०१० ते ३१ ऑगस्ट, २०१० अशी मुदतवाढ दिली आहे.

सबब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर)

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२५** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.२६ परीक्षा विभागासाठी अत्यावश्यक मनुष्यबळ तात्पुरत्या स्वरुपात (पाच महिने) वर्षा विजग्राहक या खाजगी संस्थेकडून घेतल्याचीबाब व्यवस्थापन परिषदेस माहितीस्तव**

(टिपणी: परीक्षा विभगाने दिनांक १५-०७-२०१० रोजी सादर केलेल्या टिपणीत शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून पदवी आणि पदव्युत्तर या अभ्यासक्रमांच्या परीक्षा करिता सेमिस्टर सिस्टम (सत्र पध्दती) लागू होत आहे. सदरच्या परीक्षांची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी उपलब्ध असणारा कर्मचारी वर्ग अत्यंत अपूरा पडणार आहे.

तेंव्हा परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी पेपर सेंटींग, छपाई, निकाल इत्यांदीच्या कामा करिता १५ संगणक लेखनिक व ०७ शिपाई घेण्यास बाहय स्त्रोतातून (Outsourcing) घेण्यास्तव मा.कुलगुरुंनी परीक्षा विभागाच्या कामाचे गांभीर्य लक्षात घेवून मान्यता दिली आहे.

सबब परीक्षा विभागासाठी अत्यावश्यक मनुष्यबळ तात्पुरत्या स्वरुपात (पाच महिने) वर्षा विजग्राहक या खाजगी संस्थेकडून घेतल्याचीबाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२६** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.२७ डॉ. श्रीमती यशश्री शिवाजी पवार कंत्राटी प्राध्यापक संगणकशास्त्र संकुल यांनी प्रति महिना ३०,०००/- हजार रुपये वेतन मिळणेबाबतची केलेली मागणी बाब विचारार्थ सादर.**

(टिपणी : डॉ. श्रीमती यशश्री शिवाजी पवार यांची रितसर मुलाखत घेवून तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन रु. २०,०००/- (रु. वीस हजारावर) नियुक्ती पत्र देण्यात आलेली आहे. परंतू त्यांनी हजर दिनांकापासून प्रति महिना एकत्रीत वेतन रुपये ३०,०००/- मिळावे अशी मागणी केलेली आहे. त्या सध्या गणित विषायाचे अध्यापन करतात.

गणिात विषायाचा एकुण कार्यभर ५० घडयाळी तास प्रति आठवडा आहे.

गणित विषयासाठी नियमित दोन शिक्षकाची नेमणूक केलेली आहे.

गणिात विषयाचा ८ तास कार्यभार शिल्लक असून ते सहायोगी प्राध्यापक घेत आहेत.

(एकूण कार्यभार ५० तास यापैकी २ शिक्षक ३२ तास घेतात, श्रीमती पवार १० तास व ८ तास सहायोगी प्राध्यापक असा आठवडयाचा कार्यभार वाटप आहे.

विद्यापीठास १२ बी दर्जा प्राप्त करण्यासाठी या संकुलला प्राध्यापक असणे गरजेचे आहे असे वाटते.

तरी डॉ श्रीमती यशश्री एस. पवार यांनी एकत्रीत वेतन रु. ३०,०००/- हजर दिनांकापासून केलेली मागणी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२७** | **डॉ. श्रीमती यशश्री शिवाजी पवार कंत्राटी प्राध्यापक संगणकशास्त्र संकुल यांनी प्रति महिना रु.३०,०००/- हजार वेतन दि.०१/०९/२०१० पासून आदा करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.२८** **राष्ट्रीय महामार्ग क्र-९ कि.मी..१४४.४०० ते २४९.००० कि.मी. [पुणे सोलापूर सेक्शन] [चार पदी रस्ता रुंदीकरण] या सार्वजनिक प्रयोजनार्थ जमिन संपादन करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

[सोबत-राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ [१९५६ चा ४८ ] कलम ३ G [३][४] अन्वये नोटीस]

[ टिपणी- राष्ट्रीय महामार्ग क्र-९ कि.मी..१४४.४०० ते २४९.००० कि.मी. [पुणे सोलापूर सेक्शन] [चार पदी रस्ता रुंदीकरण] या सार्वजनिक प्रयोजनार्थ जमिन संपादन करणेची नोटीस समक्ष प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र-५, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठास प्राप्त झाली आहे.

त्यानुसार गट नंबर निहाय खालील प्रमाणे विद्यापीठ मालकीची जमिन प्रस्तावित प्रयोजनार्थ संपादित करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | तालुका | गांव | गंट क्रमांक | संपादित करण्यात येणारे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | उत्तर सोलापूर | केंगाव | २९/२ ब पैकी | १०० चौ.मी. |
| ०२ | उत्तर सोलापूर | केंगाव | ३८/ २ पैंकी | ६३०० चौ.मी. |

वर नमूद केल्याप्रमाणे एकूण-६४०० चौ.मी. जाग राष्ट्रीय महामार्ग क्र-९ कि.मी. १४४.४०० ते २४९.०० कि.मी. पुणे सोलापूर चार पदी रस्ता रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनार्थ देण्याची बाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर ]

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२८** | **राष्ट्रीय महामार्ग क्र.९ च्या रुंदीकरणासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन यांनी मागणी केल्याप्रमाणे जागा देण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.२९ दिनांक २६.८.२०१० रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर**

[टिपणी- बांधकाम समितीची सभा दिनांक २६.८.२०१० रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता परिनियम क्रमांक अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर]

| | | |
|---|---|---|
| **ठराव क्र.२९** | **बांधकाम समितीच्या दि.२६/०८/२०१० रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास परिनियम ३४९ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | |
| | **बां.स.ठराव क्र.१** | **नोंद घेण्यात आली.** |
| | **बां.स.ठराव क्र.२** | **शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स.ठराव क्र.३** | **विद्यापीठ परिसरात व्यासपीठ बांधण्याच्या कामाच्या अंदाजपत्रक, नकाशाबाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु.२३,९८,०२०/- पेक्षा ३% कमी दराने म्हणजेच रु.२३,२६,०७९/- इतक्या रकमेच्या निविदेतील दरानुसार मे. विजय प्रकाश कबाडे यांना काम देण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स.ठराव क्र.४** | **विद्यापीठ परिसरात लॅन्डस्केपींगच्या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२१,००,०००/- च्या कामासाठी कमीत कमी दराच्या रु.१९,६०,६९२/- या रकमेच्या निविदेवर १% सूट देवून एकूण रक्कम रु.१०,४१,०८५/- या दराने मे. एस. एन. कोनापूरे यांना काम देण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स.ठराव क्र.५** | **विद्यापीठ परिसरातील इमारतीचे देखभाल दुरुस्तीचे वार्षिक दरकरार करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.१४,९६,८४२/- पेक्षा ६% कमी दर असणाऱ्या रु.१४,०७,०३१/- या दराने मे. प्रसाद शेटे, सोलापूर यांना देण्याबाबतची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.३०** **विद्यापीठ परीक्षांच्या परीक्षा फी (Examination fees) एकत्रीकरणाबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.परीक्षा मंडळ बैठकीसमोर ठेवण्यात येवून त्यांनी केलेली शिफारस मा. व्यवस्थापन परीषदेच्या मान्यतेस्तव सादर.**

**(सोबत प्रस्ताव जोडला आहे)**

( टिपणी -: विद्यापीठाच्या प्रचलीत परीक्षा शुल्क रचनेमध्ये Exam fees, Mod Fees, CAP Fees, व Stat. of Marks Fees etc शुल्काचा समावेश आहे. संलग्नीत महाविद्यालयांना परीक्षा शुल्काची आकारणी करतांना संभ्रम निर्माण होवून योग्य फी आकारणी करताना अडचणी येत आहेत.

(उदा. भाग १/भाग २, भाग २/भाग ३, तसेच एकत्रीत सत्रे असलेल्या परीक्षांच्या शुल्क आकारणीबाबत )

तेंव्हा प्रचलीत परीक्षा शुल्काचे एकत्रीकरण करुन खालीलप्रमाणे फी आकारण्याचे प्रस्तावित आहे.

| अं. क्र | विद्यापीठ प्रचलीत शुल्क | तपशील | शुल्क |
|---|---|---|---|
| १. | वर्ष व सत्र निहाय परीक्षा फी | मागील सत्राच्या/वर्षाच्या एकूण विषया पैकी ५०% किंवा त्या पेक्षा कमी विषय असल्यास | एकूण एकत्रीत केलेल्या शुल्काच्या ५०% शुल्क |
| २. | वर्ष व सत्र निहाय परीक्षा फी | मागील सत्राच्या/वर्षाच्या एकूण विषया पैकी ५०% पेक्षा जास्त विषय असल्यास | एकूण एकत्रीत शुल्काचे पूर्ण शुल्क |
| ३. | अल्प विद्यार्थी संख्या असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शुल्क (M.Phil./Pre.Ph.D.,M. Ed., M.P.Ed.-I, II, B.Arch., M.E., MCA (All), LL.M.,M.Pharm.इत्यादी प्रकारचे अभ्यासक्रम) | मागील सत्राच्या/वर्षाच्या एकूण विषया पैकी ५०% पेक्षा कमी किंवा ५०% पेक्षा जास्त विषय असल्यास | संबंधीत अभ्यासक्रमाचे पूर्ण शुल्क. |

विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने त्यांच्या बैठक दि. २१.०८.२०१० रोजीच्या विषय क्र. ६ वर ठराव क्र. ०६ अन्वये परीक्षा फी एकत्रीकरणाबाबतच्या व आकारणी करावयाच्या प्रस्तावास शिफारस केलेली आहे.

सबब विद्यापीठ परीक्षा फी एकत्रीकरणाची बाब व आकारावयाचा फी ची बाब तसेच परीक्षा मंडळांनी मान्यतेस्तव केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर)

| ठराव क्र.३० | **१) M.Sc. Material Science व M.Sc. Electronics (Communication Science) यांचे शुल्क हे इतर M.Sc. च्या शुल्काप्रमाणे घ्यावे. तसेच अ.क्र.१०२ व १०३ मध्ये रु.४३०/- ऐवजी रु.८६०/- अशी दुरुस्ती करावी.**<br>**२) इतर शिफारशी स्विकारण्यात आल्या.** |
|---|---|

**विषय क्र.३१ पीएच.डी.प्रवेश परीक्षे करीता परीक्षक, पेपर सेटर यांचे मानधनाचे दराबाबत मा.कुलगुरु महोदय यांनी दिलेली मान्यता मान्यतेस्तव**

[टिपणी -: सन २०१०-११ सालातील पीएच.डी.प्रवेश परीक्षे घेण्यात आली. तेंव्हा या परीक्षे करीता परीक्षक , पेपर सेटर यांची आवश्यकता होती. त्यानुसार प्रवेश परीक्षा दि. ०२.०५.२०१० रोजी घेण्यात आली. बाहेरील पेपर सेटर, परीक्षक यांचे विद्यापीठ स्थापनेपासूनचे दर अस्तित्वात नव्हते. परीक्षक, पेपर सेटर यांचे मानधनाचे दर खालीलप्रमाणे परीक्षा मंडळाच्या वतीने मा.कुलगुरु महोदय यांनी ३२ (४) अन्वये मान्यता दिलेली आहे.

Ph.D.Entrance (Paper Setting) Rs. ५००/- per set
Ph.D. Entrance (Paper Assessment) ] Rs. १०/- per paper

उपरोक्त मानधनाचे दर परीक्षा मंडळ बैठक दि. २१.०८.२०१० रोजीच्या सभेमध्ये विषय क्र. १० ठराव क्र. १० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तेंव्हा मानधन दराची व खर्चाची बाब मा.व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३१** | **पीएच.डी.प्रवेश परीक्षे करीता परीक्षक, पेपर सेटर यांचे खालीलप्रमाणे मानधनास मान्यता देण्यात आली.**<br>**Ph.D.Entrance (Paper Setting) Rs. 500/- per set**<br>**Ph.D. Entrance (Paper Assessment)] Rs. 10/- per paper** |

**विषय क्र.३२ प्रा. मारुती विठ्ठल सावंत यांना श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून जबाबदारी सोपविण्यात आल्याची बाब माहितीस्तव.**

**टिपणी :** श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जगताप मारुती एकनाथ हे दिनांक ३१-०७-२०१० रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले आहेत. प्राचार्य जगताप यांच्या जागी प्रभारी प्राचार्य नियुक्ती बाबत प्रस्तुत संस्थेत अध्यक्ष / सचिव व संस्थेचे सदस्यत्वासंदर्भात न्यायालयात वाद प्रलंबित आहे.

मा.उच्च न्यायालयाची याचिका क्र.२२१६/२००६ व महाराष्ट्र शासनाचे दिनांक ३० जानेवारी २०१० रोजीचे शासन निर्णयानुसार नियमित प्राचार्य व अधिव्याख्यातांची नेमणूक करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० पर्यंत आहे. तसेच उक्त महाविद्यालयाचे नियमित प्राचार्यांचे पद दिनांक ०१-०८-२०१० पासून रिक्त आहे. दरम्यानच्या काळात महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, विद्यापीठ व महाविद्यालयातील पत्रव्यवहार, विद्यार्थ्यांचे हित, या सर्व बाबी विचारार्थ घेता परिनियम १९१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व परिनियम **१९३(II)(a)** मधील तरतूदीनुसार महाविद्यालयातील सेवा जेष्ठ शिक्षक **प्रा. मारुती विठ्ठल सावंत** यांच्याकडे **प्रभारी प्राचार्य** म्हणून विद्यापीठाच्या विहीत नियमान्वये पाहण्याची जबाबदारी ३० नोव्हेंबर २०१० किंवा नियमित प्राचार्यांची नेमणूक होईपर्यंत जो कालावधी आधीचा असेल तोपर्यंत सोपविण्यात आले आहे, सबब माहितीस्तव).

| **ठराव क्र.३२** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.३३ श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाच्या अध्यक्ष/सचिव व सदस्यत्वासंदर्भात बाब न्याय प्रविष्ठ असल्याने, नियमित प्राचार्य नसल्याने व कांही अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त असल्याने उद्‌भवलेल्या प्रश्नावर सार्वजनिक हिताच्या दृष्टिने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ.**

**टिपणी :** श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि. सोलापूर या महाविद्यालयाची स्थापना सन १९७८ साली झालेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा या तालुक्यात सद्यस्थितीत चार महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यापैकी दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ मधील तरतूदी अन्वये विहीत प्रक्रिया राबवून संलग्निकरण काढून घेण्यात आले आहे.

सद्यस्थितीत श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या एकमेव अनुदानित महाविद्यालयात बी.ए. व बी.कॉम. हे अनुदानित अभ्यासक्रम सुरु आहेत. तसेच दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाची संलग्नता काढून घेतल्याने सदरील महाविद्यालयास पाच तात्पुरत्या तुकड्यास मान्यता देवून विद्यार्थी प्रवेशित केलेले आहेत त्याची अंदाजित विद्यार्थी संख्या १५०० आहे. सदरील महाविद्यालयात बी.सी.ए. हा विना अनुदानित अभ्यासक्रम ही सुरु आहे.

मा.उच्च न्यायालयाची याचिका क्र.२२१६/२००६ व महाराष्ट्र शासनाचे दिनांक ३० जानेवारी २०१० रोजीचे शासन निर्णयानुसार नियमित प्राचार्य व अधिव्याख्यातांची नेमणूक करण्याची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० पर्यंत आहे. तसेच उक्त महाविद्यालयाचे नियमित प्राचार्यांचे पद दिनांक ०१-०८-२०१० पासून रिक्त आहे. दरम्यानच्या काळात महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, विद्यापीठ व महाविद्यालयातील पत्रव्यवहार, विद्यार्थ्यांचे हित, या सर्व बाबी विचारार्थ घेता परिनियम १९१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व परिनियम १९३(II)(a) मधील तरतूदीनुसार महाविद्यालयातील सेवा जेष्ठ शिक्षक प्रा. मारुती विठ्ठल सावंत यांच्याकडे प्रभारी प्राचार्य म्हणून विद्यापीठाच्या विहीत नियमान्वये पाहण्याची जबाबदारी ३० नोव्हेंबर २०१० किंवा नियमित प्राचार्यांची नेमणूक होईपर्यंत जो कालावधी आधीचा असेल तोपर्यंत सोपविण्यात आले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करता अध्यक्ष/सचिव व सदस्यत्वासंदर्भात बाब न्याय प्रविष्ठ असल्याने, नियमित प्राचार्य नसल्याने व कांही अधिव्याख्यात्यांची पदे रिक्त असल्याने उद्‌भवलेल्या प्रश्नावर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३३** | **श्री. संत दामाजी महाविद्यालयाच्या संस्थेच्या अध्यक्ष / सचिव व सदस्यत्वासंदर्भातील बाब न्यायप्रविष्ट असल्याने सदर महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी प्रशासक नियुक्त करावा अशी शिफारस शासनास करण्याचे ठरले.** |

**विषय क्र.३४ मुख्य प्रशासकीय इमारत व परिक्षा भवन बांधकामाच्या प्रस्तावित कामासाठी वास्तुविशारद म्हणून देण्यात येणा-या फीबाबत.**

**[**सोबत-मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांचे पत्र जोडले आहे.**]**

[टिपणी**-** विद्यापीठाने नव्याने संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीमध्ये मुख्य प्रशासकीय इमारत आणि परिक्षा भवन इमारत बांधकामाच्या प्रस्तावित कामासाठी वास्तुविशारद म्हणून मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांची नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांना सदर कामासाठी व्यवस्थापन परिषदेतील विषय क्र.१७ दि.३०/३/२०१० नुसार मान्य झालेला नियमावलीप्रमाणे १.५% प्रमाणे फी अदा करण्यात येईल असे कळविणेत आले होते. परंतु मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांनी खालील प्रमाणे कामाचे दर असलेले कळविले आहे.

| Sr. no. | Description | Percent |
|---|---|---|
| 1 | Architectural Planning fees | 2.5 % for scope of work |
| 2 | Periodical site visit & co-ordination with other coslutants/agencies fees | 1% of cost of project |
| 3 | Structural planning | 1 % of executed cost |
| 4 | Detailed estimate including tender documents & processing of tender fees | 0.75 of cost of project |
| | Total | 5.25 % |

विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली प्रमाणे वरील सर्व कामासाठी जास्तीत जास्त ५%[प्रत्यक्ष कामाच्या रकमेच्या] तरतूदीनुसार रक्कम देय असून सदर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांनी ५ % प्रमाणे एक्झिक्युशन चार्जेसह मे. डिझाईन ग्रुप,मुंबई यांना विद्यापीठाचे काम दिले असल्याचे सादर केले आहे. सादर केलेल्या कागदपत्रानुसार मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांनी वाढीव फी ५% देण्याबाबत विनंती केली आहे.

सबब मे.डिझाईन ग्रुप,मुंबई यांना वाढीव फी देणबाबत विचारार्थ)

| ठराव क्र.३४ | मे. डिझाईन ग्रुप, मुंबई यांच्याशी वाटाघाटी करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना देण्यात आले. |
|---|---|

**<u>मा.कुलगुरु यांच्या परवागीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

**विषय क्र. ३५ (१)** **सोलापूर विद्यापीठास पात्र ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : सोलापूर विद्यापीठाकरिता ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविण्याकरिता दि.२४/०७/२०१० रोजी दै. एकमत या स्थानिक वृत्तपत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकुण सात फर्मने निविदा भरले. त्यानुसार दिनांक १७/०८/२०१० रोजी दुपारी ०४:०० वाजता जाहिरातीनुसार कागदपत्रे तपासून पात्र ठेकेदाराच्या निविदा मा. कुलगुरूंसाो व खरेदी समिती सदस्य यांच्या समोर उघडण्यात आल्या त्याच दिवशी पात्र पाच ठेकेदाराना वाटाघाटीकरिता बोलाविण्यात आले. वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीनंतरचा व निविदेतील दर यांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. तसेच ठेकेदारासोबत करावयाच्या करारपत्रकांचा नमुना सोबत जोडला आहे.

किमान वेतन कायदा १९४८ नुसार महाराष्ट्र शासनाचे जाहिर प्रकटन दि. ३० जून, २००४ नुसार खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले आहेत. सदर कायद्यात विद्यापीठ येथे काम करण्यात येणा-या कर्मचा-यांच्या संबंधित उल्लेख/ अधिसूचना नसल्याने सदर किमान वेतन कायदा १९४८ यातील जाहिर प्रकटन दि. ३० जून, २००४ नुसार कर्मचा-यांस देण्यात येणारे किमान वेतन हे खालीलप्रमाणे आहेत. सदरचे वेतन दर महिन्याच्या २६ दिवसाप्रमाणे देय राहील.

त्याचप्रमाणे सदर कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी, ई.एस.आय या सुविधा हे कर्मचाऱ्यास त्याच्या नियुक्ती दिनांकापासून लागू राहतील व सदर सूविधाकरिता कर्मचाऱ्यांच्या एकूण वेतनातचे १२.००% व प्रधान नियोक्ता (Princapal Employee) यांचे कडून कर्मचाऱ्याच्या एकूण वेतनाचे १३.६१ %, (१.६१% Process Fee) सह इतकी रक्कम जमा करणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे इ.एस.आय या सुविधेसाठी कर्मचाऱ्याच्या एकूण पगारातून १.७५ व प्रधान नियुक्त्या मार्फत कर्मचाऱ्याचा एकूण वेतनावर ४.७५% देणे बंधनकारक आहे अशी माहिती भविष्य निर्वाह निधी या कार्यालयाशी संपर्क साधले असता कळविण्यात आलेली आहे. व इ.एस.आय. बाबतची माहिती वित्त व लेखा विभाग या विभागाकडून कळविण्यात आलेली आहे. तरी उक्तबाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

**उर्वरित विषय पुढील पानावर..**

| अ. क | तपशिल | अभियंता | तारतंत्री **(कुशल)** | संगणक लेखनिक/ वाहनचालक/ प्रयोगशाळा सहाय्यक **(अर्धकुशल)** | चोकीदार/शिपाई/ माळी **(अकुशल)** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | किमान वेतन रुपये | | ३२००/- | ३१००/- | ३०००/- |
| ०२ | महागाई भत्ता रुपये | | १३९४/- | १३९४/- | १३९४/- |
| ०३ | **एकूण रुपये** | | **४५९४/-** | **४४९४/-** | **४३९४/-** |
| ०४ | व्यवसाय कर रुपये | | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ०५ | भविष्यनिर्वाह निधी कर्मचारी हिस्सा १२% | | ५५१.२८ | ५३९.२८ | ५२७.२८ |
| ०६ | भविष्यनिवार्ह निधी प्रधान नियुक्त्याचा हिस्सा १३.६१% | | ६२५.२४ | ६११. ६३ | ५९८.०२ |
| ०७ | ई.एस.आय कर्मचारी हिस्सा १.७५% | | ८०.३९ | ७८.६४ | ७६.८९ |
| ०८ | ई.एस.आय प्रधान नियुक्त्याचा हिस्सा ४.७५% | | २१८.२१ | २१३.४६ | २०८.७१ |
| ०९ | पूरवठादाराचे सेवा शुल्क | **७९/- प्रति कर्मचारी प्रति महिना** | | | |
| १० | **व्यवसाय कर** रुपये **@ १०.३०% (३+६+८+९)** | | **५६८.१९** | **५५६.००** | **५४३.८१** |
| ११ | **विद्यापीठाने आदा करावयाचे एकूण रुपये (३+६+८+९+ १०)** | | **६०८५.६३ (२६ दिवसा करिता)** (रु.२३४.०६ ~ २३४ प्रति दिवस) | **५९५४.०९ (२६ दिवसा करिता)** (रु.२२९.०० प्रति दिवस) | **५८१४.५४ (२६ दिवसा करिता)** (रु.२२३.६३ ~ २२४ प्रति दिवस) |
| १२ | **कर्मचाऱ्याला मिळणारी निव्वळ रक्कम (३-५-७)** | | **रु. ३९६२.३३~३९६२ (२६ दिवसासाठी) रु. १५२.३८ ~ १५२ (प्रती दिन )** | **रु. ३८७६.०८~३८७६ (२६ दिवसासाठी) रु. १४९.०७ ~ १४९ (प्रती दिन )** | **रु. ३७८९.८३~३७९० (२६ दिवसासाठी) रु. १४५.७६ ~ १४६ (प्रती दिन )** |

सबब, मे. आयडीयल एंटरप्राईज सोलापूर यांचेकडून रु. ७९/- प्रति कर्मचारी प्रतिमहिना या दराने मनुष्यबळ पुरवठा करण्याचीबाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव पुढील पानावर..**

<table>
<tr><td rowspan="10">ठराव क्र. ३५ (१)</td><td>१)</td><td colspan="3">मे. आयडीयल एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याकडून रु.७९/- प्रति कर्मचारी प्रति महिना या दराने मनुष्यबळ पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td>२)</td><td colspan="3">विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या मानसेवी व एकत्रित पगारावरील कर्मचाऱ्यांचे मानधन / एकत्रित वेतन खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात आले.</td></tr>
<tr><td>अ. क्र.</td><td>पदाचे नाव</td><td>सध्याचे वेतन / मानधन</td><td>सुधारीत वेतन / मानधन</td></tr>
<tr><td>१)</td><td>मानसेवी कर्मचारी</td><td>रु.५,०००/-</td><td>रु.८,०००/-</td></tr>
<tr><td>२)</td><td>विद्यापीठ अभियंता</td><td>रु.८,०००/-</td><td>रु.१२,०००/-</td></tr>
<tr><td>३)</td><td>कनिष्ठ अभियंता</td><td>रु.७,०००/-</td><td>रु.१०,०००/-</td></tr>
<tr><td>४)</td><td>संगणक लेखनिक</td><td>रु.६,०००/-</td><td>रु.८,०००/-</td></tr>
<tr><td>५)</td><td>संगणक लेखनिक</td><td>रु.४,५००/-</td><td>रु.६,०००/-</td></tr>
<tr><td>६)</td><td>तारतंत्री</td><td>रु.४,०००/-</td><td>रु.६,०००/-</td></tr>
<tr><td>७)</td><td>चौकीदार (गनसहीत)</td><td>रु.६,०००/-</td><td>रु.८,०००/-</td></tr>
</table>

**विषय क्र. ३५ (२)** **विद्यापीठातील शासकीय कंत्राटी पध्दतीने सेवेत असणाऱ्या सेवकांच्या वेतनामध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ सादर.**

(टिपणी : विद्यापीठाकडे सध्या शासकीय कंत्राटी पध्दतीने विविध पदावर १६ कर्मचारी कार्यरत असून त्यांना त्यांच्या समोर दर्शविल्याप्रमाणे सध्या पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे त्या त्या पदासाठी असलेले कमीत कमी मूळ वेतन (Fix Pay) आदा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | पाचव्या वेतन आयोगानुसार सध्या देण्यात येणारे एकत्रित वेतन (Fix Pay) | सहाव्या वेतन आयोगा मधील ग्रेड वेतन व वेतन बँड | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १. | कायदा अधिकारी | ०१ | ८०००/- | ९३०० - ३४८०० | ५४००/- |
| २. | वैद्यकीय अधिकारी | ०१ | ८०००/- | ९३०० - ३४८०० | ५४००/- |
| ३. | कंपाऊंडर (मिश्रक) | ०१ | ४५००/- | ५२०० - २०२०० | २८००/- |
| ४. | कनिष्ठ लिपिक | ०४ | ३०५०/- | ५२०० - २०२०० | १९००/- |
| ५. | दूरध्वनी चालक | ०१ | ३०५०/- | ५२०० - २०२०० | २४००/- |
| ६. | झेरॉक्स ऑपरेटर | ०१ | २५५०/- | ४४०० - ७४४० | १८००/- |
| ७. | शिपाई | ०७ | २५५०/- | ४४४० - ७४४० | १६००/- |

सदरचे देण्यात येणारे एकत्रित वेतन हे शासनाकडून विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या वेतन अनुदानातून देण्यात येते. तरी शासकीय कंत्राटी सेवकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन आदा करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ).

| ठराव क्र. ३५ (२) | **शासकीय कंत्राटी कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांच्या पदाचे कमीत कमी मूळ वेतन (ग्रेड वेतन वगळता) एकत्रित पध्दतीने (Fixed Pay) देण्यास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

| | |
|---|---|
| **विषय क्र. ३५ (३)** | **व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेची मुदत संपुष्टात आल्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर** |

**(सोबतः राजपत्राची प्रत जोडली आहे)**

(टिपणी : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -मध्य उप - विभाग, ऑगस्ट १८, २०१०/ श्रावण २७, शके १९३२ नुसार सोलापूर विद्यापीठ, सोंलापूरच्या पहिल्या व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेची मुदत दिनांक २३ नोंव्हबर, २०१० ऐवजी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी संपुष्टात आली आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३५ (३) | **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -मध्य उप - विभाग, ऑगस्ट १८, २०१०/ श्रावण २७, शके १९३२ या राजपत्राची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. ३५ (४)** **विद्यापीठातील एम.बी.ए अभ्यासक्रमासाठी व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नूतनीकरण व नैसर्गिक विस्तारासाठी शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्काची रक्कम व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत शुल्क समितीचा कार्यवृत्तांत )**

[ टिपणी : शै.वर्ष २०१०-११ पासून विद्यापीठात महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने एम.बी.ए अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी प्रती विद्यार्थ्याकडून रु.४०,१५५ इतके शुल्क आकारण्यात यावे असा दि.०९.०७.२०१० रोजीच्या बैठकीत ठराव क्रं २ अन्वये विद्यापीठ शुल्क समिती सदस्यांकडून संमत करण्यात आला आहे.

तसेच शै.वर्ष २०११-१२ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नूतनीकरण रु. २०,०००/-(भाग १ ते ४ ) व नैसर्गिक विस्ताराच्या अभ्यासक्रमाकरीता (भाग १ ते ४ ) रु.२५,००० /- शुल्क आकारण्याबाबतचा ठराव क्रं ३ अन्वये समंत केला आहे

उक्त दोन्हीं अभ्यासक्रमाचे शुल्क आकारण्याची पुढील कार्यवाही करण्याकरीता सदर शुल्कांना प्रथम विद्यापरिषेची शिफारस असणे आवश्यक आहे. व तद्नंतर विद्या परिषदेच्या शिफारसीसह सदरचा विषय व्यवस्थापन परिषदे समोर मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे.

दि.१६.०८.२०१० रोजी विद्या परिषदेची सभा संपन्न झालेली आहे. नजीकच्या काळात विद्या परिषदेची सभा लवकर आयोजित होणार नसल्यामुळे व व्यवस्थापन परिषदेची सभा दि.३०.०८.२०१० रोजी आयोजित केली आहे.

शुल्क समितीने शिफारस केलेल्या शुल्कानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी दि.३०.०८.२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत खालील प्रमाणे शुल्क मान्यतेस्तव सादर करण्यासाठी सदर शुल्कांना विद्या परिषदेच्यावतीने म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

| अनु.क्रं | अभ्यासक्रम | शुल्क रु. |
|---|---|---|
| १ | एम.बी.ए ( विद्यापीठा सुरु असलेला अभ्यासक्रम) | रु.४०,११५ /- |
| २ | **अभियांत्रिकी अभ्यासक्रम**<br>संलग्निकरणाचे नूतनीकरण | रु.२०,००० /- |
| | नैसर्गिक विस्तार | रु.२५,००० /- |

सबब व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ).

| ठराव क्र. ३५ (४) | **खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.** | | |
|---|---|---|---|
| | **अ.क्र.** | **अभ्यासक्रम** | **शुल्क रुपये** |
| | **१)** | **एम.बी.ए. (विद्यापीठात सुरु असलेला अभ्यासक्रम)** | **४०,११५/-** |
| | **२)** | **अभियांत्रिकी / औषधनिर्माण / वास्तुशास्त्र पदवीकरिता**<br>**अ) संलग्निकरणाचे नुतनीकरण (संपूर्ण महाविद्यालयासाठी)**<br>**ब) नैसर्गिक विस्तार (संपूर्ण महाविद्यालयासाठी)** | <br>**२०,०००/-**<br>**२५,०००/-** |
| | **३)** | **अभियांत्रिकी / औषधनिर्माण / वास्तुशास्त्र पदव्युत्तर पदवीकरिता**<br>**अ) संलग्निकरणाचे नुतनीकरण (संपूर्ण महाविद्यालयासाठी)**<br>**ब) नैसर्गिक विस्तार (संपूर्ण महाविद्यालयासाठी)** | <br>**२०,०००/-**<br>**२५,०००/-** |
| | **४)** | **अभियांत्रिकी / औषधनिर्माण / वास्तुशास्त्र पदवी / पदव्युत्तर पदवीकरिता प्रत्येक विषयांच्या / अभ्यासक्रमाच्या जागा वाढ** | **१०,०००/- (प्रति अभ्यासक्रम / विषय)** |
| | **५)** | **कायम संलग्निकरण असलेल्या महाविद्यालयासाठी उर्वरित अभ्यासक्रमासाठी / विषयासाठी संलग्निकरण शुल्क** | **२५,०००/- (प्रति अभ्यासक्रम / विषय)** |

| विषय क्र. ३५ (५) | **द गॅझेट ऑफ इंडिया, नुसार यापुढील प्रवेश प्रक्रियेसाठी दिनांक १८ जून २०१० रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या ठराव क्र २५(१२) अन्वये गठित करण्यात आलेल्या समितीच्या एम.फिल. / पीएच.डी. नियमावली संदर्भात शिफारशी विचारार्थ.** |
|---|---|

**(सोबत एम.फिल.पी.एचडी समितीने तयार केलेली नियमावली )**

[ टिपणी : द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of Ph.D., Regulation, 2009 नुसार एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठीची सुधारित नियमावली तयार करण्यासाठी दिनांक १९ नोव्हेबर २००९ रोजीच्या विद्यापरीषद व दिनांक ३० मार्च २०१० च्या व्यवस्थापन परीषदेमध्ये नियमावलीस मान्यताप्राप्त झाली होती त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी दिनांक २५ मार्च २०१० रोजी प्रवेशप्रक्रिया आयोजित करुन शासकिय नियमान्वये गुणवत्ता यादीतील गुणवत्तेनुसार विद्यार्थी प्रवेशित (Provisional) करुन आराखडा सादर करण्यास सूचित करण्यात आले होते त्याप्रमाणे कार्यवाही होऊन दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया सुरु आहे.

दरम्यान पीएच.डी. प्रवेशप्रक्रिया राबविताना आलेल्या अडचणी विचारार्थ घेता त्यासाठी पुन्हा दिनांक १८ जून २०१० रोजी व्यवस्थापन परीषदेमध्ये सदरचा विषय ठेवला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव समंत करुन समिती गठित करण्यात आली होती.

द गॅझेट ऑफ इंडिया, नुसार एम.फिल. व पीएच.डी. पुढील प्रवेशप्रक्रियेसाठी नियमावली दुरुस्त करण्यास्तव खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आली.

१. प्रा.एन.बी. पवार
२. प्रा.बी.पी. रोंगे
३. प्रा.डॉ. एल.पी. देशमुख
४.प्रा.डॉ. पी.जी. मोरे
५. प्रा.श्रीमती एन.व्ही. साठे
६. प्राचार्य डॉ. आर.एन.शेंडगे

पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी उक्त समितीने नियमावली तयार करुन विद्यापीठ प्रशासनाकडे सादर करावी असे ठरले.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सदर समितीने अनुक्रमे दिनांक ९-७-२०१०, ७-८-२०१०, ११-८-२०१० व २६-८-२०१० रोजी बैठका आयोजित करुन एम.फिल. व पीएच.डी. साठी स्वतंत्र नियमावली दुरुस्त करुन खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

शिफारस १ : द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of M.Phil./Ph.D., Regulation, 2009 अन्वये पुढील पीएच.डी. प्रवेशप्रक्रियेसाठी सोबतचे पान क्र---- ची नियमावली शिफारस करण्यात येत आहे (सोबत सहपत्र १)

शिफारस २ : द गॅझेट ऑफ इंडिया, दिनांक ११ जुलै २००९ च्या Minimum Standards and procedure for award of M.Phil./Ph.D., Regulation, 2009 अन्वये पुढील एम.फिल.प्रवेशप्रक्रियेसाठी सोबतचे पान क्र---- ची नियमावली शिफारस करण्यात येत आहे (सोबत सहपत्र २)

शिफारस ३ : उक्त दोन्ही नियमावलीची अंमलबजावणी तातडीने करणे आवश्यक असल्याने नजीकच्या काळात विद्यापरीषदेची बैठक आयोजित होणार नाही यास्तव उक्त दोन्ही नियमावलीस मा.कुलगुरु महोदयांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने मान्यता देण्यास्तव शिफारस करण्यात येत आहे.

सदरील नियमावलीस मा.कुलगुरु महोदयानी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सबब उक्त समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.]

| ठराव क्र. ३५ (५) | **R.Ph.D.-15-(iv) मध्ये, 80% ऐवजी 90% व 20% ऐवजी 10% अशा दुरुस्तीसह सुधारीत नियमावली मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

| | |
|---|---|
| **विषय क्र. ३५ (६)** | **Purchasing - Plastic coated self gumming cloth ledger envelope with printing.** |

**( Comparative Chart )**

टिपणी : दि. २५/८/२०१० रोजी घेण्यात आलेल्या खरेदी समितीच्या बैठकीमध्ये परीक्षा विभागातर्फे खरेदी करण्यात येणा-या छपाई स्टेशनरी करितां वाटाघाटी करण्यासाठी पुरवठाधारकांना बोलाविण्यात आलेले होते. यादरम्यान मोहिनी प्रिंटर्स या पुरवठाधारकाने Plastic coated self gumming cloth ledger envelope with printing चा पुरवठा करण्यास नकार दिला. मोहिनी प्रिंटर्स नंतर सदरच्या साहित्याचा पुरवठा करण्यास तयार असलेल्या पुरवठाधारकाच्या दरामध्ये व मोहिनी प्रिंटर्स यांच्या दरामध्ये बरीच तफावत असल्यामुळे खरेदी समितीने सुचविलेल्याप्रमाणे सदरच्या लिफाफा खरेदी करण्याकरितां स्थानिक बाजारपेठेतून निविदा मागविली व त्याचा तौलनिक तक्ता सोबत जोडलेला आहे.

सदरील तौलनिक तक्त्यास मा.कुलगुरु महोदयानी खरेदी समितीच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सबब उक्त समितीच्या व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.]

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ३५ (६)** | **तौलोनिक तक्ता विचारात घेता व याच सभतेील विषय क्र. २४ मधील दि.२६/०८/२०१० च्या खरेदी समितीच्या सभेतील विषय क्र. ७ नुसारच्या तक्त्यामधील अ.क्र. ३२ चे दर विचारात घेता सदरची खरेदी ही मे. तातीज् एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याकडून रु.६९,०००/- या दराने करण्यास मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ३५ (७)** | **प्रा. डॉ. बारबोले ए. एन., व्यवस्थापन परिषद सदस्य तथा अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा यांचे दि.३०/०८/२०१० रोजीचे पत्र विचारार्थ.** |

**(सोबत पत्राची प्रत)**

(टिपणीः प्रा. डॉ. बारबोले ए. एन., व्यवस्थापन परिषद सदस्य तथा अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा यांचे दिनांक ३०/०८/२०१० रोजीचे प्रा. डॉ. पिरगोडे बी. आर., संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे संदर्भातील पत्र विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ३५ (६)** | **व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एन. बारबोले यांच्या पत्राची नोंद घेण्यात आली.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**